मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मालमत्ता करावरील सवलतींचा लाभ घेण्याची अखेरची संधी

## सवलतींचा लाभ घेण्यासाठी 30 जून 2026 ही अंतिम तारीख असून त्यानंतर पूर्ण कर भरावा लागणार आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

मालमत्ता करावरील आकर्षक सवलतींचा लाभ घेण्यासाठी पिंपरी चिंचवडकरांकडे आता अवघे काहीच दिवस शिल्लक आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून वेळेत कर भरणाऱ्या, ऑनलाइन मालमत्ता कर, महिला मालमत्ताधारक, दिव्यांग व्यक्ती, स्वातंत्र्यसैनिक तसेच पर्यावरणपूरक उपक्रम राबविणाऱ्या संस्था आणि आस्थापनांसाठी ५ ते ५० टक्क्यांपर्यंतच्या विविध सवलती देण्यात येत आहेत. या सवलतींचा लाभ घेण्यासाठी ३० जून २०२६ ही अंतिम तारीख असून त्यानंतर पूर्ण कर भरावा लागणार आहे.



महानगरपालिकेने वेळेत कर भरणाऱ्या, ऑनलाइन मालमत्ता कर, महिलांच्या नावावर मालमत्ता असलेल्या तसेच पर्यावरणपूरक उपक्रम राबविणाऱ्या नागरिकांसाठी आणि संस्थांसाठी विशेष सवलती लागू केल्या आहेत. अनेक मालमत्ताधारकांनी या सवलतींचा लाभ घेतला आहे. तसेच अनेक मालमत्ताधारकांनी अद्याप कर भरलेला नाही. अशा मालमत्ताधारकांना ३० जून २०२६पूर्वी मालमत्ता कर भरून सवलतींचा लाभ घ्या, असे आवाहन कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, ३० जूनपूर्वी कर भरल्यास मिळणारी ५ टक्के सवलत आणि ऑनलाइन कर भरण्यासाठी मिळणारी अतिरिक्त ५ टक्के सवलत यामुळे पात्र मालमत्ताधारकांना आर्थिक लाभ मिळू शकतो. तसेच महिलांच्या नावावरील निवासी मालमत्तांसाठी ३० टक्के, दिव्यांग व्यक्तींसाठी ५० टक्के आणि स्वातंत्र्यसैनिक, विधवा पत्नी यांना मालमत्ता करात सवलत देण्यात आली आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेणाऱ्या गृहनिर्माण संस्था आणि आस्थापनांनाही विविध सवलती दिल्या जात आहेत. कंपोस्टिंग प्रकल्प, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP), झिरो वेस्ट संकल्पना तसेच ग्रीन बिल्डिंग उपक्रम राबविणाऱ्या संस्थांना ३ टक्क्यांपासून १५ टक्क्यांपर्यंत सवलतीचा लाभ मिळू शकतो.

> **पिंपरी चिंचवड हे वेगाने विकसित होणारे शहर आहे. रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण आणि इतर नागरी सुविधांचा विस्तार करण्यासाठी महापालिकेला सक्षम आर्थिक पाठबळ आवश्यक असते. नागरिकांनी भरलेला मालमत्ता कर हा शहराच्या विकासाचा महत्त्वाचा आधार आहे. महापालिकेने दिलेल्या विविध सवलतींचा लाभ घेत ३० जून २०२६ पूर्वी कर भरावा आणि आपल्या शहराच्या विकासात थेट सहभाग नोंदवावा.**
>
> - रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,


> **महानगरपालिकेने दिलेल्या विविध सवलतींचा लाभ घेत शहरातील लाखो मालमत्ताधारकांनी वेळेत मालमत्ता कर भरला असून त्यांना आर्थिक लाभही मिळाला आहे. मात्र, अद्याप अनेक मालमत्ताधारकांकडे कराची थकबाकी आहे. उपलब्ध सवलतींचा लाभ घेण्यासाठी थकबाकीदारांनी ३० जून २०२६ पूर्वी मालमत्ता कर भरावा. नागरिकांच्या कररूपाने मिळणाऱ्या महसुलातूनच शहरातील विकासकामे आणि नागरी सुविधा अधिक सक्षमपणे राबविता येतात.**
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# पवना धरण परिसरात पावसाची दमदार हजेरी; 24 तासांत 42 मिमी पावसाची नोंद

## धरणातील पाणीसाठा 18.02 टक्क्यांवर, वाढीव पाणीकपात कमी होण्याची आशा

**पिंपरी | प्रतिनिधी**

मागील साडेसहा वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठ्याला सामोरे जात असलेल्या आणि शुक्रवार (१९ जून) पासून वाढीव १५ टक्के पाणीकपातीचे संकट ओढावलेल्या पिंपरी-चिंचवडकरांसाठी दिलासादायक बातमी आहे. शहराची तहान भागविणाऱ्या पवना धरणात परिसरात पावसाने हजेरी लावली आहे. गेल्या चोवीस तासात ४२ मिली मीटर पावसाची नोंद झाली आहे. धरणातील पाणीसाठा १८.०२ टक्के झाला आहे.



शहरात २५ नोव्हेंबर २०१९ पासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. अनियमित, अपुरे आणि कमी दाबाने पाणी येत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. असे असतानाच यंदा पावसाने ओढ दिल्याने पवना धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होऊन १९ टक्क्यांवर आला होता. या पार्श्वभूमीवर पाटबंधारे विभागाने १५ टक्के आणखी पाणीकपात करण्याचे आदेश महापालिकेला दिले होते. त्यानुसार महापालिकेने शुक्रवार पासून त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. त्यामुळे पवना धरणातून महापालिकेला ५५० ऐवजी ४७५ एमएलडीच पाणी मिळत आहे. त्यामुळे प्रशासनाने पाण्याच्या वेळामध्ये कपात केली आहे. तेव्हापासून अपुरा, कमी दाबाने, विस्कळीत पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

ओढ दिलेल्या पावसाने धरण परिसरात हजेरी लावली आहे. गेल्या चोवीस तासात ४२ मिली मीटर पावसाची नोंद झाली आहे. धरणातील पाणीसाठा १८.०२ टक्के झाला आहे. एक जून पासून आतापर्यंत धरण परिसरात ६५ मिली मीटर पाऊस झाला आहे. दरम्यान, मागीलवर्षी आतापर्यंत ४७.६४ पाणीसाठा धरणात झाला होता.

# पिंपरी-चिंचवडमधील कोचिंग क्लासेसमध्ये अग्निसुरक्षेचा गंभीर प्रश्न

## मर्यादित जागा, अपुरी फायर सेफ्टी आणि नियमभंगामुळे मोठ्या दुर्घटनेचा धोका; नियमित तपासणीची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी - चिंचवड शहरात खासगी कोचिंग क्लासेस आणि प्रशिक्षण संस्थांचे जाळे मोठ्या प्रमाणात विस्तारले आहे. हजारो विद्यार्थी विविध क्लासेसमध्ये शिक्षण घेत आहेत. मात्र, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष होत असल्याचे निरीक्ष ण अग्निशमन विभागाने नोंदवले आहे. वेळीच आवश्यक सुरक्षाव्यवस्था उभारली नाही, तर भविष्यात गंभीर दुर्घटना घडू शकतात, असा इशाराही विभागाकडून देण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड हे राज्यातील महत्त्वाचे औद्योगिक आणि शैक्षणिक केंद्र म्हणून विकसित झाले आहे. आयटी, ऑटोमोबाईल, उत्पादन उद्योग आणि सेवा क्षेत्रातील वाढत्या रोजगाराच्या संधींमुळे राज्यासह देशभरातील विद्यार्थी शहरात दाखल होत आहेत. याच पार्श्वभूमीवर कोचिंग क्लासेस, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्रे आणि खासगी शैक्षणिक संस्था मोठ्या प्रमाणात सुरू झाल्या आहेत. अनेक संस्था व्यावसायिक संकुल, बहुमजली इमारती आणि गाळ्यांमध्ये कार्यरत आहेत. मात्र, बहुतांश ठिकाणी अग्निसुरक्षेचे निकष काटेकोरपणे पाळले जात नसल्याचे दिसून येत आहे.

मर्यादित जागेत क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना बसविणे, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग अपुरे असणे, जिने व कॉरिडॉरमध्ये साहित्य ठेवणे, अग्निशामक यंत्रणा कालबाह्य होणे, फायर अलार्म प्रणाली कार्यरत नसणे तसेच विद्युत यंत्रणांची नियमित तपासणी न करणे अशा बाबी अनेक ठिकाणी आढळून येतात. दुर्घटना घडल्यास काही मिनिटांचा विलंबदेखील मोठ्या जीवितहानीचे कारण ठरू शकतो, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

शैक्षणिक संस्थांमध्ये आग लागण्याच्या घटनांमध्ये विद्युत यंत्रणांमधील बिघाड, शॉर्टसर्किट, वातानुकूलन यंत्रणेतील दोष, ज्वलनशील साहित्याचा वापर आणि निष्काळजीपणा ही प्रमुख कारणे आढळून येतात. त्यामुळे संस्थांनी अग्निसुरक्षेला केवळ कागदोपत्री बाब म्हणून न पाहता ती दैनंदिन व्यवस्थापनाचा भाग बनविण्याची गरज असल्याचे मत अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनी 'व्यक्त केले.



### सुरत, लखनऊ दुर्घटनांमधून धडा

» गुजरातमधील सुरत येथे २४ मे २०१९ रोजी तक्षशिला आर्केडमधील कोचिंग क्लासला लागलेल्या भीषण आगीत २२ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता. आग आणि धुरामुळे अनेक विद्यार्थी वरच्या मजल्यावर अडकले होते. काही विद्यार्थ्यांनी जीव वाचविण्यासाठी इमारतीवरून उड्या मारल्याचे चित्र देशाने पाहिले होते. या दुर्घटनेनंतर कोचिंग क्लासेसच्या अग्निसुरक्षेचा मुद्दा राष्ट्रीय पातळीवर चर्चेत आला होता. अलीकडेच उत्तर प्रदेशातील लखनौ येथे प्रशिक्षण संस्थेशी संबंधित इमारतीत लागलेल्या आगीत १५ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली. या घटनेनंतर गर्दीच्या वापराच्या इमारतींमधील अग्निसुरक्षा उपाययोजनांबाबत पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत.

### बचाव आराखडा आवश्यक

» विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी प्रत्येक कोचिंग क्लास आणि प्रशिक्षण संस्थेमध्ये कार्यरत अग्निशामक यंत्रणा, फायर अलार्म, आपत्कालीन प्रकाश व्यवस्था, धूर नियंत्रण प्रणाली आणि सुरक्षित निर्गमन मार्ग असणे आवश्यक आहे; तसेच विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांसाठी नियमित मॉक ड्रिल घेणे, आपत्कालीन परिस्थितीत कसे वागावे याचे प्रशिक्षण देणे आणि बचाव आराखडा तयार ठेवणे गरजेचे आहे.

### कोचिंग क्लासेसचे वाढते जाळे

» हिंजवडी, वाकड, पिंपळे सौदागर, चिंचवड, निगडी, आकुर्डी, भोसरी, चाकण आणि रावेत परिसरात स्पर्धा परीक्षा, जेईई-नीट, एमपीएससी-यूपीएससी, बँकिंग, परदेशी शिक्षण, आयटी आणि कौशल्य विकास प्रशिक्षण देणाऱ्या शेकडो संस्था कार्यरत आहेत. दररोज हजारो विद्यार्थी या संस्थांमध्ये ये-जा करतात. त्यामुळे या परिसरातील शैक्षणिक संस्थांमध्ये अग्निसुरक्षा व्यवस्थेचे महत्त्व अधिक वाढले असून संबंधित यंत्रणांनी नियमित तपासणी मोहीम राबविण्याची गरज व्यक्त होत आहे.

# आषाढी वारीसाठी पिंपरी-चिंचवड पोलीस सज्ज; पालखी सोहळ्याच्या सुरक्षा नियोजनाचा आढावा

## 7 जुलैला तुकाराम महाराज तर 8 जुलैला ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान; वाहतूक, गर्दी नियंत्रण आणि कायदा-सुव्यवस्थेसाठी व्यापक तयारी

**पिंपरी | प्रतिनिधी**

जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या ३४१ व्या आषाढी वारी पालखी प्रस्थान सोहळ्याचे ७ जुलै २०२६ आणि श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या १९५ व्या पालखी प्रस्थान सोहळ्याचे ८ जुलै २०२६ रोजी आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजक, विश्वस्त आणि पोलीस अधिकाऱ्यांच्या स्वतंत्र आढावा बैठका पार पडल्या.

बैठकीत पालखी मार्ग, मंदिर परिसर, वाहतूक व्यवस्था, पर्यायी मार्ग, दिंडींच्या वाहनांचे नियोजन, वारकऱ्यांना मार्गदर्शन, गर्दी नियंत्रण तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पालखी सोहळा शांततेत, सुरक्षित आणि भक्तिमय वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

विश्वस्तांनी मांडलेल्या सूचना आणि अडचणींची नोंद घेऊन संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना पूर्वतयारीचे निर्देश देण्यात आले. यावेळी दोन्ही पालखी सोहळ्यांच्या विश्वस्तांचा पोलीस आयुक्तांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. बैठकीस पोलीस सहआयुक्त, अपर पोलीस आयुक्त, विविध विभागांचे पोलीस उपआयुक्त तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.



### पालखी सोहळ्यासाठी व्यापक सुरक्षा नियोजन

» आषाढी वारीनिमित्त लाखो वारकरी देहू आणि आळंदी येथे दाखल होणार असल्याने पिंपरी-चिंचवड पोलिसांनी सुरक्षा आणि वाहतूक व्यवस्थेचे सविस्तर नियोजन केले आहे. पालखी मार्ग, मंदिर परिसर, मुक्कामस्थळे आणि प्रमुख चौकांमध्ये अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात केला जाणार आहे. गर्दी नियंत्रणासाठी सीसीटीव्ही, ड्रोन आणि नियंत्रण कक्षाची मदत घेतली जाणार आहे. वारकऱ्यांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी स्वयंसेवक, आयोजक आणि विविध शासकीय विभागांमध्ये समन्वय ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सुरक्षित आणि भक्तिमय वातावरणात पालखी सोहळा पार पाडण्यावर भर देण्यात आला आहे.

# समाविष्ट गावांच्या पाण्यासाठी आता स्पष्ट नियम

## महिन्याभरात तयार होणार नवीन धोरण; पाणी पुरवठ्याची जबाबदारी विकसकांचीच

**पुणे | प्रतिनिधी**

समाविष्ट ३२ गावांमधील बांधकाम प्रकल्पांना पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी संबंधित विकासकांचीच असणार आहे. मात्र, त्यासाठी त्यांच्याकडून घेण्यात येणारे हमीपत्र अधिक स्पष्ट असेल आणि यासाठी नवीन धोरण तयार करण्यात येणार आहे.

पाण्याबाबतचे धोरण तयार करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी लागणार असून त्यानंतर त्याची अंमलबजावणी केली जाईल, अशी माहिती महापालिकेचे शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी दिली. या गावांची जबाबदारी पीएमआरडीएकडे असताना तसेच त्यानंतर महापालिकेकडे असतानाही नवीन बांधकामांच्या ठिकाणी पाणी देण्याची जबाबदारी विकसकावरच टाकली होती. मात्र, त्यासाठी घेतल्या जाणाऱ्या हमीपत्रातील तरतुदी स्पष्ट नसल्याने, त्याचा गैरफायदा घेत बांधकाम व्यावसायिक रहिवाशांना पाणी देण्यास टाळाटाळ करत आहेत.

त्यातच, शहरात पाणीकपात सुरू केल्यानंतर या गावांमध्ये महापालिकेकडून केला जाणारा पाणी पुरवठा कमी झाला आहे. यामुळे या गावांमध्ये पाणीटंचाईची समस्या अधिक तीव्रपणे जाणवत आहे. अनेक गृहनिर्माण प्रकल्पांतील रहिवाशांना पुरेशा पाण्यासाठी अतिरिक्त खर्च करावा लागत आहे.

सदनिकाधारकांना बांधकाम व्यावसायिकाने पाणी देणे बंद केल्याने सोसायट्यांना खासगी टँकर किंवा अन्य पर्यायांवर अवलंबून राहावे लागत आहे. त्यासाठी त्यासाठी दरमहा लाखो रुपयांचा खर्च करावा लागत आहे.

उन्हाळ्यापुरतीच नव्हे तर वर्षभर पाण्यासाठी पैसे मोजण्याची वेळ तेथील नागरिकांवर येत असल्याने याबाबत स्पष्ट धोरण तयार करण्याची मागणी सोसायट्या तसेच ग्रामस्थांकडून केली जात आहे. ही बाब लक्षात घेऊन आता महापालिकेकडून या हमीपत्रात स्पष्टता आणली जाणार आहे.

या शिवाय, पारदर्शकता वाढविण्यासाठी महापालिकेकडून विकासकांनी दिलेली हमीपत्रे आणि मंजूर प्रकल्पांची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाणार आहे. सध्या सुमारे २५० विकासकांची माहिती प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे नागरिकांना प्रकल्प खरेदीपूर्वीच संबंधित ठिकाणच्या पाणीपुरवठ्याची जबाबदारी कोणाची आहे, याची माहिती मिळू शकणार आहे.



### पाणीपुरवठा धोरणाला मिळणार पारदर्शकतेची जोड

» समाविष्ट ३२ गावांमधील गृहनिर्माण प्रकल्पांबाबत पाणीपुरवठ्याची जबाबदारी कोणाची, याबाबत अनेकदा वाद निर्माण होत होते. आता महापालिका नवीन धोरणाद्वारे ही जबाबदारी स्पष्ट करणार आहे. विकासकांकडून घेतल्या जाणाऱ्या हमीपत्रात पाणीपुरवठ्याच्या अटी स्पष्टपणे नमूद केल्या जाणार आहेत. तसेच मंजूर प्रकल्पांची आणि विकासकांनी दिलेल्या हमीपत्रांची माहिती महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यामुळे घर खरेदीदारांना प्रकल्पातील पाणीपुरवठ्याची स्थिती आणि जबाबदारीची माहिती आधीच मिळेल. यामुळे नागरिकांची फसवणूक टाळण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे.

### पाणीटंचाईचा सर्वाधिक फटका समाविष्ट गावांना

» शहरातील पाणीकपात आणि अपुरा पुरवठा याचा सर्वाधिक परिणाम समाविष्ट ३२ गावांतील नागरिकांवर होत आहे. अनेक गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये विकासकांकडून पाणीपुरवठा बंद किंवा मर्यादित केल्याने रहिवाशांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. त्यासाठी दरमहा हजारो ते लाखो रुपयांचा अतिरिक्त खर्च करावा लागत असल्याची तक्रार आहे. वर्षभर पाण्यासाठी पैसे मोजण्याची वेळ येत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेचे नवे धोरण आणि विकासकांवरील स्पष्ट जबाबदारी नागरिकांसाठी दिलासादायक ठरणार असल्याचे मानले जात आहे.

> “ महापालिकेची पाणीपुरवठा व्यवस्था सक्षम होईपर्यंत प्रकल्पांना पाणी देण्याची जबाबदारी विकासकांचीच आहे. यासंदर्भातील हमीपत्रांसह प्रकल्पांची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध करून ती नियमित अद्ययावत ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. नवीन धोरण एका महिन्यात तयार होईल.
>
> - अनिरुद्ध पावसकर, शहर अभियंता

---

# पुण्यात संततधार पावसामुळे वाहतुकीचा बोजवारा! मुंबई-पुणे एक्सप्रेसवेचा वेगही मंदावला

## पुणे शहरात मंगळवार रात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार संततधार पावसामुळे ठिकठिकाणी वाहतूक विस्कळीत झाली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे वाहतूक विस्कळीत झाली. वाहतूक संथगतीने सुरू असल्याने प्रमुख रस्त्यावर कोंडी झाली.

शहर परिसरात मंगळवारी (२३ जून) सायंकाळी सातच्या सुमारास पाऊस सुरू झाला. रात्रभर शहरात पाऊस सुरू होता. बुधवारी (२४ जून) सकाळी आठनंतर पावसाचा जोर वाढला. शाळकरी विद्यार्थी, नोकरदार पावसात बाहेर पडले. मोठ्या संख्येने मोटारी रस्त्यावर आल्याने वाहतुकीचा वेग संथ झाला. पावसामुळे सिंहगड रस्ता, कर्वे रस्ता, अहिल्यानगर रस्ता, गणेशखिंड रस्ता, पुणे-सोलापूर रस्ता, पुणे-सातारा रस्ता, तसेच बाह्यवळण मार्गावरील वारजे पूल परिसरातील वाहतूक विस्कळीत झाली. पावसामुळे खड्ड्यात पाणी साचल्याने वाहनचालकांना वाट काढणे अवघड झाले. शहरातील बहुतांश रस्त्यावरील वाहतूक संथगतीने सुरू होती. पाणी साचल्याने वाहतूक विस्कळीत झाली.

शहरात पाऊस सुरू झाल्याने वाहतुकीचा वेग संथ झाल्याने वाहतूक नियोजन करण्यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे, अशी माहिती वाहतूक शाखेतील अधिकाऱ्यांनी दिली.

लोणावळा, मावळ तालुक्यात पाऊस सुरू असल्याने मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक संथगतीने सुरू होती. घाट क्षेत्रात वाहतूक संथगतीने सुरू होती. घाट क्षेत्र, तसेच द्रुतगती मार्गावरील वाहतूक नियोजन करण्यासाठी महामार्ग पोलिसांनी पोलीस कर्मचारी तैनात केले आहेत, अशी माहिती महामार्ग पोलिसांच्या नियंत्रण कक्षाकडून देण्यात आली.



### द्रुतगती मार्गावरही पावसाचा परिणाम

» लोणावळा आणि मावळ तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतुकीचा वेगही मंदावला. विशेषतः घाट परिसरात वाहनांच्या हालचाली संथ झाल्याने काही काळ वाहतूक कोंडीची स्थिती निर्माण झाली. वाढती वाहनसंख्या आणि खराब हवामान लक्षात घेऊन महामार्ग पोलिसांनी घाट विभागात अतिरिक्त कर्मचारी तैनात केले आहेत. वाहनचालकांनी सुरक्षित अंतर राखून प्रवास करावा, वेग मर्यादेचे पालन करावे आणि आवश्यक असल्यासच प्रवास करावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# मराठी चित्रपट महामंडळाचा मोठा निर्णय; 45 हजार सभासदांना मतदानाचा हक्क

## 'ब' वर्गातील सभासदांना 'अ' वर्गात समाविष्ट करण्यास मान्यता; चित्रपट संमेलन, चित्रनगरी आणि वेतनवाढीबाबतही निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या 'ब' वर्गातील साठ हजार सभासदांपैकी ४५ हजार सभासदांना 'अ' वर्गात समाविष्ट करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मंगळवारी झालेल्या कार्यकारिणी बैठकीत घेण्यात आला. महामंडळाच्या नुकत्याच झालेल्या पंचवार्षिक निवडणुकीत 'अ' वर्गातील केवळ ३ हजार ४०३ सभासद मतदानासाठी पात्र ठरले होते. नव्याने समाविष्ट झालेल्या ४५ हजार सभासदांना यापुढे मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. तसेच, चित्रपट महामंडळाला राज्य सरकारचा अधिकृत कॅबिनेट दर्जा देण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

'सन २०१५ पासून सदस्य असलेल्या आणि किमान तीन वर्षे सक्रिय काम केलेल्या ४५ हजार 'ब' वर्ग सभासदांना 'अ' वर्ग सभासद म्हणून मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. चित्रपट क्षेत्रातील सुमारे ६० हजार कलाकार आणि तंत्रज्ञांचा पुढील तीन महिन्यांत आरोग्य विमा उतरविण्यात येणार आहे. सर्व सभासदांची माहिती ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असेही राजेभोसले यांनी सांगितले. या वेळी उपाध्यक्ष धनाजी यमकर, प्रमुख कार्यवाह सुशांत शेलार, खजिनदार सुनील महाजन, संचालक वर्षा उसगावकर आदी उपस्थित होते.

'चित्रपट क्षेत्रातील कामगारांच्या हितासाठी २०२५ च्या वेतन कराराच्या धर्तीवर २० टक्के वेतनवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मालिकेच्या कलाकारांना सद्यःस्थितीत किमान ९० दिवसांनंतर मानधन मिळते. ते दर महिन्याला मानधन मिळावे, यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. चित्रीकरणादरम्यान फसवणुकीचे प्रकार टाळण्यासाठी भरारी पथक भेट देणार आहे,' असेही सांगण्यात आले.

बैठकीत ज्येष्ठ कलाकारांसाठी विशेष मानधन योजना, वृद्धाश्रम उभारणी, मुंबई-पुण्यात विश्रामगृहे, राज्यभर कंटेनर थिएटर, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, अहिल्यानगर येथे महामंडळाचे संपर्क कार्यालय तसेच पुण्यात चित्रनगरी उभारण्यासाठी राज्य सरकारकडे पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच, महामंडळाच्या १७ संचालकांमार्फत राज्यातील ३६ जिल्ह्यांचे पालकत्व स्वीकारले जाणार आहे.

साहित्य संमेलन आणि नाट्य संमेलनाप्रमाणे आता दर वर्षी अखिल भारतीय मराठी चित्रपट संमेलन आयोजित करण्याचा निर्णय चित्रपट महामंडळाने घेतला आहे. 'पहिले मराठी चित्रपट संमेलन' फेब्रुवारी २०२७ मध्ये होणार असून, त्यासाठी पुणे आणि रत्नागिरी या ठिकाणांचा विचार सुरू आहे,' असे मेघराज राजेभोसले यांनी सांगितले.



### ४५ हजार सभासदांना मिळणार मतदानाचा अधिकार

**» अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाने 'ब' वर्गातील ४५ हजार सभासदांना 'अ' वर्गात समाविष्ट करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सन २०१५ पासून सदस्य असलेल्या आणि किमान तीन वर्षे सक्रियपणे कार्यरत असलेल्या सभासदांना ही संधी मिळणार आहे. यामुळे यापूर्वी मतदानापासून वंचित असलेल्या हजारो कलाकार, तंत्रज्ञ आणि कामगारांना महामंडळाच्या निवडणुकांमध्ये मतदानाचा अधिकार मिळेल. मराठी चित्रपटसृष्टीतील लोकशाही प्रक्रियेला बळकटी देणारा हा निर्णय मानला जात असून, सभासदांच्या प्रतिनिधित्वात मोठी वाढ होणार आहे.**

### २०२७ मध्ये पहिले मराठी चित्रपट संमेलन

**» साहित्य संमेलन आणि नाट्य संमेलनाच्या धर्तीवर आता दरवर्षी अखिल भारतीय मराठी चित्रपट संमेलन आयोजित करण्यात येणार आहे. पहिले मराठी चित्रपट संमेलन फेब्रुवारी २०२७ मध्ये आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, पुणे आणि रत्नागिरी या शहरांचा संभाव्य स्थळ म्हणून विचार सुरू आहे. याशिवाय ज्येष्ठ कलाकारांसाठी विशेष मानधन योजना, वृद्धाश्रम, मुंबई-पुण्यात विश्रामगृहे, राज्यभर कंटेनर थिएटर आणि विविध शहरांत संपर्क कार्यालये उभारण्याचा संकल्प महामंडळाने जाहीर केला आहे.**

### २० टक्के वेतनवाढीची घोषणा

**» चित्रपट क्षेत्रातील सुमारे ६० हजार कलाकार आणि तंत्रज्ञांसाठी पुढील तीन महिन्यांत आरोग्य विमा योजना लागू करण्यात येणार आहे. तसेच २०२५ च्या वेतन कराराच्या धर्तीवर २० टक्के वेतनवाढ देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. मालिकांमधील कलाकारांना वेळेवर मानधन मिळावे यासाठी दरमहा मानधन देण्याबाबत प्रयत्न सुरू करण्यात येणार आहेत. चित्रीकरणादरम्यान होणारी फसवणूक रोखण्यासाठी भरारी पथक नियुक्त करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.**

# खडकवासला धरणक्षेत्रात मान्सूनचे आगमन; वरसगाव-पानशेतमध्ये दमदार पाऊस

## धरणसाखळीत पाणीसाठा 13 टक्क्यांवर; पुणेकरांना दिलासा, मात्र ओढे-नाल्यांत प्रवाह सुरू होण्याची प्रतीक्षा

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या दोन आठवड्यांपासून प्रतीक्षेत असलेल्या मान्सूनने अखेर मंगळवारी (दि. २३) रायगड जिल्ह्याच्या हद्दीवरील पानशेत खोऱ्यातील घाटमाथ्यासह धरणक्षेत्रात दमदार हजारी लावली. दिवसभरात वरसगाव येथे १८, तर पानशेत येथे १७ मिलिमीटर पाऊस पडला. खडकवासला धरणमाथ्यावर दिवसभरात पावसाची नोंद झाली नाही, तर टेमघर येथे ४ मि.मी. पाऊस पडला.

सिंहगडच्या पश्चिम खोऱ्यासह पानशेत, मुठा, मोसे, शिरकोली, दापसरे, धामण ओहोळ खोऱ्यात सायंकाळी पावसाची रिपरिप सुरु होती. धरणक्षेत्रातील मान्सूनच्या दमदार आगमनामुळे पुणेकरांसह जिल्ह्यातील एक कोटी नागरिकांना दिलासा मिळणार आहे. सायंकाळी पाच वाजता खडकवासला धरणसाखळीत ३.८४ टीएमसी म्हणजे केवळ १३.१६ टक्के पाणीसाठा शिल्लक होता. गतवर्षीच्या तुलनेत धरणसाखळीत अल्प पाणीसाठा आहे. गेल्या वर्षी धरणसाखळीत ३५.८३ टक्के पाणीसाठा होता

मंगळवारी (दि. २३) रायगड जिल्ह्याच्या हद्दीवरील पानशेत खोऱ्यातील घाटमाथ्यासह धरणक्षेत्रात दमदार हजारी लावली. दिवसभरात वरसगाव येथे १८, तर पानशेत येथे १७ मिलिमीटर पाऊस पडला. खडकवासला धरणमाथ्यावर दिवसभरात पावसाची नोंद झाली नाही, तर टेमघर येथे ४ मि.मी. पाऊस पडला.



> **धरणक्षेत्रात प्रथमच पाऊस पडत आहे. पावसाचे पाणी जमिनीत मुरत आहे. अद्याप ओढे-नाले-नद्यांतून पाण्याचे प्रवाह सुरू झाले नाहीत. त्यामुळे धरणसाठ्यात भर पडण्यास सुरुवात झाली नाही. पावसाचा जोर कायम राहिल्यास धरणसाठ्यात दोन दिवसांत मंदगतीने भर पडण्यास सुरुवात होईल.**
>
> **- गिरिजा कल्याणकर-फुटाणे, खडकवासला धरण विभाग, शाखा अभियंता**